Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# मूनी नावाचं लून

अमेरिकेतल्या फ्लॉरिडा प्रांतात पाम बीचमधल्या एका खाडीच्या किनाऱ्यावर आम्हाला मूनी सापडला. सापडला म्हणण्यापेक्षा तो भेटला असं म्हणणं जास्त योग्य होईल. पण पक्षी भेटला असं कसं म्हणायचं? म्हणून सापडला म्हणते. पाम बीच हा फ्लॉरिडाचा विभाग उष्ण हवेचा व गोव्यासारखा आहे. समुद्र व जमिनीची मिळून लहान बेटं निर्माण करणाऱ्या खाड्यांचं जाळं, भरतीच्या वेळी पाण्याखाली जाणारी व ओहोटीच्या वेळी तळाची दलदल दाखवणारी छोटीमोठी बेटं, वाळूने रंगवलेली किनारपट्टी, नारळ, पाम, संत्री, कॅक्टसची झाडं, किनाऱ्याला मँग्रोव्ह या मुळाने आपलं साम्राज्य पसरवणाऱ्या, दलदलीत फोफावणाऱ्या झुडपांची दाटी, मँग्रोव्हमधून डोकं काढणारी रानटी काटेरी फुलझाडं, मधूनच विस्तारलेल्या सागरगोट्यांच्या वेली व घाणेरीची झुडुपं, कॅक्टसची बेटं असं हे पाम बीचचं रंगीबेरंगी रूप आहे. आम्ही भर हिवाळ्यात बर्फमय बॉस्टनमधून, एक आठवड्याची सुट्टी घेऊन या अमेरिकन गोव्याला आलो होतो. ढगाळलेलं आकाश, निष्पर्ण झाडं आणि चराचराला गोठवणारी थंडी यांतून उठून गरम हवेत जाताना जो उन्माद चढतो तो आम्हाला चढलेला होता. खरं म्हटलं तर तो उन्माद आम्हाला चढायला बॉस्टनच्या विमानतळावरच सुरुवात झाली होती. तिथे आम्ही सर्वांनी जाडे थंडीचे कोट, हातमोजे, टोपी ही आवरणं साप कात टाकतो तशी काढून टाकून दिली होती. फ्लॉरिडाच्या विमानतळावर पोचताच अंगावरचा स्वेटर, पायमोजे या उरलेल्या थंडीप्रतिबंधक कपड्यांचाही आम्ही त्याग केला. घाईघाईने आम्ही आमच्या चपला, लांड्या बाह्यांचे शर्ट व साधी कॉटन पँट घालून हिंडायला बाहेर पडलो.

आम्हाला सर्वांनाच गरम हवेची नशा दारूसारखी चढली होती. मुलं कानात वारं शिरलेल्या वासरासारखी सैरावैरा धावत सुटली होती. मलाही सबंध दिवस बाहेर हिंडत घालवायचा होता. चेहऱ्यावर, उघड्या हातावर सूर्यकिरणं झेलायची होती. समुद्राचा खरा वारा अंगाशी झोंबत असताना वाळूत धावायचं होतं ... वाळूत पाय ठेवताच आम्हाला दिसलं की समुद्राला ओहोटी लागलेली आहे. आमच्या मुलांना ओहोटीच्या वेळी उघडी पडलेली, उथळ खाडीतली बेटं आवडतात. ओहोटीच्या वेळी निर्माण होणाऱ्या छोट्या डबक्यात जीवजीवाणू सहज दृष्टीला पडतात. पाण्यानी ही बेटं आच्छादलेली असली की ते दिसत नाहीत. मुलांना हे छोटे जीवाणू पकडून परत पाण्यात सोडायला फार आवडतं म्हणून अशा चिमुकल्या बेटाच्या मधून वेड्यावाकड्या जाणाऱ्या पायवाटेने आम्ही निघालो.

आठ वर्षांचा अश्विन व चौदा वर्षांची रती मासे, छोटे खेकडे, हॉर्स शू क्रॅब्ज, लहान कासवं व फुलपाखरांत गुंतलेले होते. मी फुलं, कॅक्ट्स, पक्षी यांच्यात रमले होते. जेमतेम अर्धा मैल आम्ही तोच "लून"ही अश्विनची ललकारी माझ्या कानावर पडली. मी अश्विनजवळ गेले. तो एका मॅंग्रोव्हच्या वलयामधल्या दोन फुटी बेटात बसलेल्या एका बदकासारख्या दिसणाऱ्या प्राण्याकडे बघत 'लून लून' म्हणत सगळ्या जगाला आपल्या शोधाची बातमी देत होता. ताबडतोब रती व शरद तिथे येऊन पोचलेच. लून पक्षी थंडीत फ्लॉरिडात राहतात. उन्हाळ्यात अंडी घालायला उत्तरेत जातात. ते पाण्यात खोल श्वास धरून खूप अंतर पोहू शकतात. खूप उंचावरून जोरात पाण्यात सुळकी मारून मासे पकडतात. इत्यादी माहिती मला देत अश्विन मॅंग्रोव्हच्या दाट मुळामधल्या दलदलीत सुकट जागा शोधून त्यावर पावलं टाकत लूनजवळ जाण्याचा प्रयत्न करू लागला. कार्ट्याच्या मेंदूच्या कम्प्युटरमध्ये पशुपक्ष्यांच्या लाईफ हिस्टरीचं पूर्ण ज्ञान भरलेलं असतं, पण शाळेत होमवर्क काय दिलं ते त्याला कधी आठवत नाही. अश्विनची वटवट ऐकत शरद व रती पण वेगळया दिशेने लूनजवळ सरकतच होते. मला एकच गहन प्रश्न सतावत होता. 'माणसं एवढी जवळ आली तरी हा लून स्वस्थ का बसून आहे ?' उत्तरादाखल मॅंग्रोव्हच्या त्या वलयातून रतीची एक किंकाळी माझ्या कानावर आली. पाठोपाठ अश्विनचं "मॉम, लूनच्या डोक्याला जखम झालीय" हे वाक्य ऐकू आलं. 'जखमी पक्षी ! संपलीच आमची मजा ! आता सबंध दिवस लूनच्या तैनातीत जाणार !' माझ्या डोक्यात स्वार्थी विचाराची वावटळ उठली.

मी जवळ एक खडक शोधून बसकण मारली. मॅंग्रोव्हच्या वलयातून संभाषण ऐकू येतच होतं.

“लूनच्या डोक्यातून पांढरं काय दिसतंय ?” अश्विन.

“त्याचा मेंदू आहे तो. त्याची कवटी फुटलीय.” रती.

“मेंदू ?” अश्विनचा  रडवेला प्रश्न. “मेंदू फुटलाय तर तो जगेल कां ?”

“मेंदू नाही फुटलाय. तो नुसता दिसतोय. कवटी फुटलीय.” रतीची चूक दुरुस्ती.

“कवटी फुटलीय तर तो जगेल कां ?” अश्विनला लूनच्या आजाराच्या निदानापेक्षा तो जगेल कां याचीच काळजी वाटत होती.

“जगेल का माहीत नाही. पण याक्षणी तो जिवंत आहे. आपल्याकडे बघतोय ना ? आणि मान पण हलवतोय.” रतीचं उत्तर.

“आपण त्याला मूनी म्हणू या” अश्विनने लूनचे बारसे केले.

त्या लूनच्या डोळ्यात अश्विनला भ्रमिष्ठपणा दिसला असावा. मूनी म्हणजे भ्रमिष्ट. “मला नाही वाटत मूनी जगेल.” शरदने गंभीर आवाजात उच्चारलेले शब्द. बराच वेळ विचार करून त्याने हे विधान केलं असावं. “मरेलही कदाचित. पण आत्ता तो जिवंत आहे ना ? मग जगवण्याचा प्रयत्न नको करायला ?” रतीने हा प्रश्न विचारून पुरा दिवस लूनच्या तैनातीत जाणार ही माझी भीती सार्थ असल्याचं सिद्‌ध केलं.

मी मॅंग्रोव्हच्या वलयात शिरून मुनीला निरखून बघितलं. त्या मण्यासारख्या गोल काळ्या डोळ्यात मला अपेक्षित वेदना दिसली नाही. त्याच्या डोळ्यात होती एक प्रकारची स्थितप्रज्ञता. त्याच्या भोवती होणाऱ्या घडामोडीशी त्याचा जणु संबंधच नव्हता, असा मला भास झाला. थोडावेळ विचार करून मी सुचवलं “हा कॉंझर्वेशन पार्क आहे. आपण पार्क रेंजरला शोधू. तो पोचवेल मूनीला हॉस्पिटलात.” ही कल्पना रती आणि अश्विनला पटली असं मला वाटलं. “पण इथे थांबून कुणी मुनीचं रक्षण करायला हवं” शरद म्हणाला. “तू त्याच्या भोवती लक्ष्मणरेषा काढ.” मी सुचवलं. “गिधाडं रावणासारखी चालत येत नाहीत.” शरदने आकाशात आमच्या पर्यायाने मूनीच्या डोक्यावरती तरंगणाऱ्या गिधाडाकडे बोट दाखवलं. मी आकाशात दृष्टिक्षेप टाकला. चारपाच गिधाडं तिथे संथपणे तरंगत होती. मूनीच्या मृत्यूची चाहूल त्यांना लागली असावी. ‘मग तू स्टार वॉरसारखं इलेक्ट्रॉनिक कवच टाक मूनीभोवती’ मी म्हणाले. ‘मी इथे थांबतो. तुम्ही वॉर्डनला शोधा.’ शरदने सांगितले. रती, अश्विन व मी वॉर्डनच्या शोधात तीन दिशांना

विखुरलो व अर्ध्या तासाने परत आलो. वॉर्डन बेपत्ता होता. "मी ॲनिमल रेस्क्यू लीगला फोन करते.' मी सुचवलं. रती, अश्विन व शरद लूनीवर पहारा करत बसले.

मी ॲनिमल रेस्क्यू लीगला फोन करण्यासाठी परत कांडोत आले. फोन एका व्हॉलंटियर बाईने घेतला. "तासाभरात कुणी तरी फोन करून पुढे काय करायचं ते कळवील", असं ती म्हणाली. मी तासभर नखं आणि दात चावत बसून राहिले. दोनदा रती, 'पुढे काय ?' हे विचारायला व लूनसाठी पाणी न्यायला येऊन गेली.

एका तासाने खरंच फोन आला. "ॲनिमल रेस्क्यूच्या सर्व गाड्या बिझी आहेत. तुम्ही लूनला सँक्चुअरीत पोचवाल का ?" ॲनिमल रेस्क्यूवाल्याने विचारलं. नाही म्हणणं मला शक्य नव्हतं. मग त्याने मला लून कसं पकडायचं याबद्दल फोनवरच सूचना दिल्या आणि सँक्चुअरीत कसं जायचं ते समजावून सांगितलं. त्याची बडबड ऐकत मी कागदावर रस्त्याचा नकाशा काढला. फोन ठेवल्यावर त्या नकाशाकडे बघताना मला अभिमन्यूला चक्रव्यूहात अडकल्यावर काय वाटलं असेल याचा अनुभव आला. रस्ता हमखास चुकणार आणि डिरेक्शन नीट न लिहून घेतल्याबद्दल शरदचं व माझं भांडण होणार हा आडाखा मनात बांधत मी कांडोमधून बाहेर पडले व शेजारचं दार ठोठावलं. शेजारणीला मी माझ्या मोहिमेचा हेतू सांगितला व तिच्याकडे लेटेक्स ग्लोव्हज् आणि पुठ्ठ्यांचा खोका आणि वर्तमानपत्र मागितलं. 'सुट्टीत आलाय तर मजा करा. कवटी फुटलेलं लून जगणार आहे का ?' शेजारणीने प्रश्न विचारला. 'आमची मुलं ऐकणार नाहीत.' मी सांगितलं. 'महामूर्ख बाई आहे.' अशी भावना तिच्या चेहऱ्यावर उमटली, पण मुकाट्याने घरात जाऊन तिने एक खोका, ग्लोव्हज् व वर्तमानपत्र आणून दिलं.

एवढावेळ का लागला तुला ? शरदने मी पोचताच विचारलं 'कांडोत बसून रहायची हौस होती मला' असं म्हणत मी तो खोका व ग्लोव्हज् शरदला दिले व माझ्या डोळ्यावरचा गॉगल काढून त्याला लावला आणि मी वर्तमानपत्र खोक्यात पसरलं. 'हातमोजे कशाला?' म्हणत शरदने ते घातले आणि मॅग्रोव्हमध्ये जाऊन त्यानं लूनला उचललं आणि जटायूने रावणाशी कसं युद्ध केलं असेल याचं प्रात्यक्षिक मला बघायला मिळालं. मूनीने ग्लोव्हचा अनेक ठिकाणी चावा घेतला आणि दोनदा शरदच्या डोळ्याच्या दिशेने झेप घेतली. थोडक्यात आमची मदत त्याने सायुद्ध नाकारली. मला सँक्चुअरीवाल्याच्या सूचनांचं पालन करण्याचा शहाणपणा केल्याबद्दल मनापासून आनंद झाला. मोठ्या कष्टाने शरदने मूनीला खोक्यात बंदिस्त केलं. खोक्याला वरून दोन भोकं पाडली व खोका दोरीने

बांधला. खोक्यात ठेवायचं पाणी मात्र तसंच रतीच्या हातात राहिलं. खोका शरदने कारच्या डिकित ठेवला आणि आम्ही सॅंक्चुअरीच्या शोधात बाहेर पडलो. तासाभरात आम्ही गावाबाहेर पोचलो. रस्ते मातीचे व अरुंद होते. धूळ उडू लागली. माझ्या अपेक्षेप्रमाणे आम्ही हरवलो. शरद माझ्या अंगावर ओरडला. मुलांचे चेहरे सुकले. त्यांना भूक व तहान लागली असावी, पण प्रसंग पाहून ती गप्प बसली असावीत, असा मी अंदाज केला. अखेरीस सॅंक्चुअरी सापडली. आम्ही तारांच्या जाळ्यांची दोन फाटकं उघडून जाळीच्या पिंजऱ्यात शिरलो. गर्द झाडीतून जाणारी जाळीच्या छपराखालची पायवाट व जाळीत मुक्तपणे उडणारे पक्षी बघून एका पुराण कालीन आश्रमात आल्याचा मला भास झाला. मी भारून जागीच उभी राहिले. तेवढ्यात एक उंच, पांढऱ्या दाढीचा, निळ्या डोळ्यांचा व एप्रन घातलेला ऋषीच पायवाटेने संथपणे चालत आमच्या दिशेने येताना मला दिसला.

आयुष्य जंगली पशुपक्ष्यांना वाहून घेतलेल्या या ऋषीच्या डोळ्यात स्थितप्रज्ञता नव्हती. त्याच्या चेहऱ्यावरून, डोळ्यातून, एवढंच नव्हे तर प्रत्येक हालचालीतून भूतदया ओसंडत होती. त्याच्या हालचालीत संथपणा होता. अमेरिकेतल्या फास्ट लाईफचा त्याच्या जगात मागमूसही नव्हता. त्याने घातलेल्या मळकट पांढरे कपडे आणि त्यावरचा रबरी एप्रन यांना अनेक रंगीबेरंगी डाग पडले होते. पण का कोण जाणे त्या स्थानी त्याचे ते कपडे आणि तो शोभूनच दिसत होते. 'कम ऑन मेन' च्या पलिकडे आमच्या स्वागतासाठी त्याने शब्दही उच्चारले नाहीत. पण त्याच्या प्रत्येक हालचालीत स्वागत अभिप्रेत होतं. अजूनही आम्ही जागीच खिळून उभे होतो अलगदपणे त्याने शरदच्या हातातला खोका घेतला. पाच मिनिटाने त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या किमयेतून मी जागी झाले व आसपास बघू लागले. तोपर्यंत आम्ही आतल्या चार खणी हॉस्पिटलात पोचलो होतो व मुलं कुठेतरी उधळत होती. त्या सर्व खोल्यात भिंतीलगत पांढऱ्या तारेचे पिंजरे एकावर एक असे रचून ठेवले होते. काही मोकळे होते. तर काहीत पक्षी माना टाकून पडले होते. इतरांना मलमपट्टी केलेली होती. तो ऋषी मूनीचे बॉक्स उघडू लागला, तोच कर्कश किंचाळी मारत एक निळा तुरेवाला मोरपंखी पक्षी त्याच्या खांद्यावर येऊन बसला. 'हेवा करायचं कारण नाही बॉबी' ऋषी त्याला म्हणाला. आमच्या चेहऱ्यावरची प्रश्नचिन्हे पाहून त्याने खुलासा केला. "या बॉबीचे पंख फारच दुखावलेत. तेव्हा हा इथेच राहतो. माणसांची फारच सवय झालीय त्याला. मी दुसऱ्या कुठल्या पक्षाला हात लावला तर त्याला हेवा वाटतो." लाडावलेल्या बॉबी बाळाकडे मी कौतुकाने बघितलं. एव्हाना तो ऋषीच्या खांद्यावरून वाकून मूनीच्या

बॉक्सात बघत होता. ‘पक्षांनाही हेवा वाटतो’ हे ज्ञान मला त्यादिवशी झालं. ‘जेनी, तुझ्याकडे पेशंट आलाय.’ ऋषीने ललकारी दिली व ‘माझं नाव डॉक्टर लॉगफर्ड’ अशी स्वतःची ओळखही करून दिली. आतून एक पांढरा झगा व एप्रन घातलेली बाई धावत आली. “मी जेनी लॉगफर्ड” जखमी पक्षांना सांभाळण्याचे माझं काम. मी त्यांना मलमपट्टी करते.” बोलता बोलता तिने गॉगल लावला, ग्लोव्हज् चढवले, व मूनीच्या बॉक्सकडे ती वळली. “माय पुअर बेबी ! व्हॉट हॅपन्ड .. ओ .. ओ ..ओ..” असं म्हणत फडफडणाऱ्या मूनीला तिने उचललं व एका तारेच्या पिंजऱ्यात ठेवलं. क्षणभर बडबड थांबवून तिने मूनीच्या जखमांचं निरीक्षण केलं. तिच्या डोळ्यांत उमटलेली निराशा मला स्पष्ट दिसली. “याला आणल्याबद्दल  तुमचे अत्यंत आभार” असे म्हणत तिने तिथल्या ट्रेवरचं बँडेज उचललं.

जेनी अगदी नवऱ्याविरुद्ध होती. तो संथ, शांत, अबोल तर ही घाईगडबडीतली अन् बोलकी. परस्परविरुद्ध असले तरी त्यांना जोडणारा एक चिवट धागा मला स्पष्ट दिसला. पशुपक्षांविषयी निःसीम प्रेम त्या दोघांच्याही प्रत्येक हालचालीतून, शब्दातून निथळत होतं.

आता उधळलेली मुलं धावत आत आली. बॉबी रतीच्या खांद्यावर विराजमान झाला होता. ‘आमचा मूनी जगेल ना ?’ अश्विन जेनीला विचारू लागला. ‘अर्थात, मी त्याला मुळीच मरू देणार नाही.’ तिने आश्वासन दिलं. शरद व मी डॉ. लॉगफर्डबरोबर बाहेर पडलो. प्रथमच मी अंगणाचं बारकाईने निरीक्षण केलं. मधल्या पायवाटेलगत दोन्ही बाजूला तारेचे चाळीस फूटी पिंजरे होते. काहींत अनेक पक्षी होते. त्या पक्षांच्या संरक्षणासाठी ही व्यवस्था होती. एका पिंजऱ्यात काही लहान प्राणी होते. दोन कोल्हे, एक साळींदर, एक रानमांजर, दोन घुबडं, ससाणा, दोन मोर, हरिण, फ्लेमिंगो, सँड पाइपर असे पशुपक्षी मला ओळखता आले. त्या प्रचंड पिंजऱ्यांना डबल दरवाजे होते. एक दार उघडलं, की दुसरं बंद ठेवायचं. बंदिस्त पक्षांना उडून जाता येऊ नये म्हणून ही व्यवस्था होती. “शक्यतो आम्ही या पशुपक्षांना ते बरे झाल्यावर परत ते सापडलेल्या जागी पोहोचवतो. ज्यांना कायमच्या दुखापतीमुळे स्वतंत्र जगणं अशक्य आहे त्यांनाच इथे ठेवून घेतो, अथवा एखाद्या झूला देऊन टाकतो.” डॉ. लॉगफर्डने आम्हाला सांगितलं.

मुलं जवळपास नाहीत असं बघून त्यांनी आम्हाला बातमी दिली. “तुमचा मूनी जगणार नाही. आत्महत्या करण्यासाठीच तो किनाऱ्यावर येऊन बसला होता. कधी कधी लून पाण्यात जोराने खोल जातात तेव्हा त्यांच्या फुप्फुसाला इजा होते. आपण मरणार हे कळलं की ते किनाऱ्यावर येऊन बसतात. मग गिधाडं त्यांना टोचून मारतात.

त्याची कवटी गिधाडानेच फोडलीय. आम्ही त्याला वाचवण्याचा प्रयत्न करू, पण तो बहुतेक जगणार नाही. तुम्ही इथे आणखी थोडा वेळ राहिलात तरी माझी हरकत नाही. पण मला कामाला लागायला हवं. गुड बाय." असं म्हणत डॉ. लॉगफर्ड हॉस्पिटलात नाहीसा झाला. थोडक्यात मूनी हा खरोखरच समाधी घेतलेला ऋषी होता. "आपण स्वतंत्रपणे जगू शकणार नाही हे समजताच आत्महत्या करून घेणारे पशुपक्षी शहाणे की मरण समोर दिसत असताना जगण्यासाठी धडपडणारी माणसं शहाणी ?" याचा विचार करत मी एक दगडावर बसून राहिले.

शरद रती व अश्विनला शोधत त्या पिंजऱ्यात नाहीसा झाला. तासाने अक्षरशः तहानभूक विसरलेल्या रती अश्विनला त्याने खेचतच सँक्चुअरीतून बाहेर काढलं. जाताजाता दरवाज्यावर लावलेल्या डोनेशनच्या बॉक्सात त्याने चेक टाकला. पुढचे चार दिवस रती नेमाने सँक्चुअरीला फोन करून मूनीची खुशाली विचारात होती. मूनीला बघायला त्यांना न्यायला धीर मात्र शरदला व मला झाला नाही. अजूनही "मूनी शहाणा की माणसं शहाणी या" प्रश्नाचे उत्तर मी शोधत आहे.

पूर्वप्रसिद्धी, पशुप्रेमीयांच्या दुनियेत स्नेहवर्धन प्रकाशन, जून १९९४